# House Breaker Arrested by Dhule Police

Local Crime Branch Dhule Arrested House Breaker and Detected House Breaking offences of Dhule City.

बातमी मागची बातमी

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने अट्टल चोरटा इम्रानला शिताफीने पकडले

## घरफोडीच्या खास पद्धतीमुळे चोर जेरबंद

प्रतिनिधी | धुळे

घरफोडीप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने अटक केलेल्या इम्रान उर्फ बाचक्या शेख याची घरफोडी करण्याची विशेष पद्धत होती. त्याचबरोबर चोरी केल्यानंतर इम्रान मालेगाव येथे पळ काढत असे. त्याच्या याच पद्धतीमुळे त्याला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले. सद्य:स्थितीत तो आझादनगर पोलिसांच्या ताब्यात आहे.

शहरात गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या घरफोड्या पोलिस प्रशासनासाठी डोकेदुखी ठरत आहेत. त्यामुळे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक देविदास शेळके यांच्या सूचनेवरून चोरट्यांना पकडण्यासाठी एक स्वतंत्र पथक गठीत करण्यात आले होते. या पथकाला घरफोड्यामागे इम्रान शेख खालिद याचा हात असल्याची माहिती मिळाली होती. इम्रान विशिष्ट पद्धतीने कडीकोयंडा व कुलूप आवाज न करता क्षणार्धात तोडायचा. शरीराने सडपातळ व चपळ असल्यामुळे अगदी छोट्याशा जागेतूनही तो घर-दुकानांमध्ये शिरायचा. त्याची चोरीची पद्धत इतरांपेक्षा वेगळी होती. घरफोडीसाठी विशिष्ट प्रकारचा रॉड तयार केला जातो. हा रॉड तो चोरीच्या वेळी मोटारसायकलच्या सीटखाली सोबत ठेवायचा. त्याचबरोबर घरफोडी केल्यावर मालेगावला पसार होत असे. तो ज्या पद्धतीने घरफोडी करायचा त्याच पद्धतीने शहरात काही घरफोड्या झाल्या होत्या. त्यामुळे पोलिसांना या चोऱ्यांमागे इम्रानचा हात असल्याचा संशय होता. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने त्याच्यावर पाळत ठेवली होती; परंतु तो पोलिसांना गुंगारा देण्यात यशस्वी ठरत होता. त्यामुळे इम्रानला गजाआड करण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने थेट मालेगावहून फिल्डिंग लावली. तेथील एका खबऱ्याला त्याच्यावर पाळत ठेवण्यास सांगण्यात आले. नेहमीप्रमाणे तो मालेगाव बाहेर जाताना दिसताच या खबऱ्याने स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेत गजाआड केले.

### गुन्ह्यांची उकल होण्यास मदत

घरफोडीमागे इम्रानचे नाव समोर आल्यावर जिल्हा पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील व अतिरिक्त पोलिस अधीक्षक चंद्रकांत गवळी यांना माहिती दिली. त्यांनी केलेल्या सूचनेनंतर इम्रानला अटक करण्यात आली. त्यामुळेच इतर गुन्ह्यांची उकल होऊ शकली.

**देविदास शेळके, पोलिस निरीक्षक, एलसीबी, धुळे.**

### सर्वच पोलिस ठाण्याच्या हद्दीत कहर

इम्रानने पश्चिम देवपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन तर आझादनगर, देवपूर व धुळे शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत प्रत्येकी एक घरफोडी केल्याची कबुली दिली आहे. त्याला आझादनगर पोलिसांनी गजाआड केले आहे. त्याकडे आता घरफोडीच्या विविध गुन्ह्यांची चौकशी सुरू करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली.